**मा.उपमुख्यमंत्री(श्री.एकनाथ शिंदे) यांचे शासकीय निवासस्थान "नंदनवन" येथे खानपान सेवा पुरवठादाराची नियुक्ती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः** उपुनि-२०२५/प्र.क्र.२५/२०२५/मंआस्था-२(२१-अ)
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: १३ एप्रिल, २०२६

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांकः उपुनि- २०२२/प्र.क्र.१९१/२०२२/२१-अ , दि.०६ एप्रिल,२०२३
२. शासन निर्णय क्रमांकः उपुनि- २०२२/प्र.क्र.१९१/२०२२/२१-अ, दि.०३ जानेवारी,२०२४
३. शासन निर्णय क्रमांकः उपुनि- २०२५/प्र.क्र.२५/२०२५/मंआस्था-२(२१-अ), दि.२७ मे,२०२५
४. शासन निर्णय क्रमांकः उपुनि- २०२५/प्र.क्र.२५/२०२५/मंआस्था-२(२१-अ), दि.०८ जुलै,२०२५
५. शासन निर्णय क्रमांकः उपुनि- २०२५/प्र.क्र.२५/२०२५/मंआस्था-२(२१-अ),दि.२५ ऑगस्ट,२०२५
६. शासन निर्णय क्रमांकः उपुनि- २०२५/प्र.क्र.२५/२०२५/मंआस्था-२(२१-अ),दि.१५ सप्टेंबर,२०२५
७. शासननिर्णयक्रमांकःउपुनि-२०२५/प्र.क्र.२५/२०२५/मंआस्था-२(२१-अ), दि.३१ ऑक्टोबर,२०२५

**प्रस्तावना:-**

तत्कालीन मा. मुख्यमंत्री (श्री. एकनाथ शिंदे) तसेच उपमुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस) यांच्या अनुक्रमे "वर्षा" व "सागर" या शासकीय निवासस्थानी खानपान सेवा पुरवठादाराची नियुक्ती करण्यासाठी दिनांक १३/१२/२०२२ रोजी ई-निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेची प्रक्रिया पूर्ण करून तत्कालीन मा. मुख्यमंत्री (श्री. एकनाथ शिंदे) व मा. उपमुख्यमंत्री (श्री देवेंद्र फडणवीस) यांच्या शासकीय निवासस्थानी दिनांक ६ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णय अन्वये मे. श्री सुखसागर हॉस्पिटॅलीटी सर्विसेस मुंबई व मे. छत्रधारी कॅटरर्स मुंबई यांची दिनांक १०/०४/२०२३ ते दिनांक ०९/०४/२०२५ पर्यंत दोन वर्षाकरिता नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यान मा. मंत्रिमंडळामध्ये श्री. अजित पवार यांची मा. उपमुख्यमंत्री पदी नियुक्ती झाल्यामुळे दिनांक ३ जुलै, २०२५ पासून त्यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी खानपान सेवा पुरविण्यासाठी दिनांक ३ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णय अन्वये मे. छत्रधारी कॅटरर्स यांची नियुक्ती करण्यात आली.

तद्नंतर डिसेंबर २०२५ मध्ये नवीन सरकार अस्तित्वात आले त्यामध्ये मा. श्री देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्री पदावर तर मा. श्री. एकनाथ शिंदे व मा. श्री. अजित पवार यांची उपमुख्यमंत्री पदावर नियुक्ती करण्यात आली. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या "वर्षा" या शासकीय निवासस्थानी मे. श्री.सुखसागर हॉस्पिटॅलीटी सर्विसेस यांची दिनांक ६ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयान्वये खानपान सेवा पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यात आल्यामुळे त्यांची सेवा पुढे चालू राहिली तसेच मा. उपमुख्यमंत्री (श्री. अजित पवार) यांच्या देवगिरी या शासकीय निवासस्थानी देखील मे. छत्रधारी कॅटरर्स यांची सेवा पुढे चालू राहिली. तथापि, मा. उपमुख्यमंत्री (श्री.एकनाथ शिंदे) यांच्या शासकीय निवासस्थानी खानपान सेवा पुरवठादाराची नियुक्ती करण्याबाबत कोणतेही निदेश प्राप्त न झाल्यामुळे नियुक्ती करण्यात आलेली नाही.

दरम्यानच्या कालावधीत मा.मुख्यमंत्री तसेच मा.उपमुख्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थानी अनुक्रमे श्री.सुखसागर हॉस्पिटॅलिटी सर्विसेस व मे.छत्रधारी कॅटरर्स यांची खानपानसेवा पुरवठादार म्हणून केलेली नियुक्ती

दिनांक ०९/०४/२०२५ रोजी संपुष्टात आल्यामुळे शासन निर्णय दिनांक २७/०५/२०२५, दिनांक ०८/०७/२०२५, दिनांक २५/०८/२०२५, दिनांक १५/०९/२०२५ व दिनांक ३१/१०/२०२५ अन्वये वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढ दिनांक ०९/०१/२०२६ रोजी संपुष्टात आलेली आहे.

या अनुषंगाने मा. उपमुख्यमंत्री (श्री. एकनाथ शिंदे) यांच्या "नंदनवन" या शासकीय निवासस्थानी येणाऱ्या अतिथीसाठी खानपान सेवा पुरवठादाराची नियुक्ती करण्याची तसेच सद्याच्या सेवापुरवठादारास मुतदवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे

**शासन निर्णय:-**

१. मा. उपमुख्यमंत्री (श्री. एकनाथ शिंदे) यांच्या "नंदनवन" या शासकीय निवासस्थानी येणाऱ्या अतिथींसाठी खानपान सेवा पुरविण्यासाठी दिनांक १ मे, २०२५ पासून श्री.सुखसागर हॉस्पिटॅलिटि सर्विसेस यांची खानपान सेवा पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२. नवीन खानपानसेवा पुरवठादाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास आणखी काही कालावधी लागणार असल्यामुळे सद्याचे सेवापुरवठादार मे. श्री सुखसागर हॉस्पिटॅलिटी सर्विसेस व मे.छत्रधारी कॅटरर्स यांना ३ महिन्याची म्हणजे दिनांक १०/०१/२०२६ ते दिनांक ०९/०४/२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

## दरपत्रक

| SR. NO. | FOOD ITEMS | Rate of Central Caterers(Rupee) |
|---|---|---|
| | **ANNEXURE A (Gen.food Items)** | |
| 1 | Tea (with milk) (125 ml) | १८.०० |
| 2 | Coffee (125 ml) | १३.०० |
| 3 | High Tea (Pestry/Sweet, kaju-badam, Sandiwitch, Wafer, | ७०.०० |
| 4 | Various cold drinks (250/300 ml) | १५.०० |
| 5 | Dahi misal (100 gm) | १५.०० |
| 6 | Idli (2 no) | २८.०० |
| 7 | Vada sambhar (2 no) /Tomato Omlet | २८.०० |
| 8 | Potato Vada (2 no) | २७.०० |
| 9 | Dahi vada (2 no) | १५.०० |
| 10 | Sabudana Vada (2 no) /Sabudana khichadi (75 gm) | १५.०० |
| 11 | Kachori (75 gm) | १५.०० |
| 12 | Veg cutlet (2 no) | १५.०० |
| 13 | Upama/Sheera/(Poha) | २६.०० |
| 14 | Sada Dosa | १५.०० |
| 15 | Masala Dosa (75 gm) | २०.०० |
| 16 | Uttappa (75 gm) | १५.०० |
| 17 | Veg Sandwich | १८.०० |
| 18 | Cheese sandwich | १८.०० |

| | | |
|---|---|---|
| 19 | Chicken Sandwich | २०.०० |
| 20 | Veg Sandwich Grilled | २०.०० |
| 21 | Cheese sandwich Grilled | २०.०० |
| 22 | Chicken Sandwich Grilled | २२.०० |
| 23 | Wafers (75 gm) | १०.०० |
| 24 | Bhaji/Mix bhaji/Pakoda (75 gm) | १८.०० |
| 25 | Biscuits | १५.०० |
| 26 | Dry fruits/ Cashew nut (75 gm) | २५.०० |
| 27 | Pineapple Sheera/Moong Halawa/Gajar Halawa/ Gulabjamun (2 no) Rasgulla (2 no) | २०.०० |
| 28 | Veg Soup | १८.०० |
| 29 | Chicken Soup | २०.०० |
| 30 | Pav Bhaji | २२.०० |
| 31 | Aloo Palak | १५.०० |
| 32 | Paneer Matar | १८.०० |
| 33 | Methi Besan | १५.०० |
| 34 | Veg Biryani | २५.०० |
| 35 | Chicken/Mutton Biryani | ३५.०० |
| 36 | Veg Fried Rice | २०.०० |
| 37 | Non veg Fried Rice | २४.०० |
| 38 | Veg Thali (Full) | ६५.०० |
| 39 | NonVeg Thali (Full) | ६८.०० |
| 40 | Veg Exe Buffet (Soup, Starter, Main Course,Roti, Dal, Rice, Salad, Sweets and Fruits) | १६०.०० |
| 41 | NonVeg Exe Buffet (Soup, Starter, Main Course,Roti, Dal, Rice, Salad, Sweets and Fruits) | १७५.०० |
| 42 | Bisleri 500ml/1000ml | १०.०० |
| 43 | Fruit Dish | १५.०० |
| 44 | Fruits Salad | १५.०० |
| | **Total** | १३३६ |
| | **ANNEXURE B ( Occaisionally Needed Spl.Food Items )** | |
| 1 | Spl Veg Buffet Lunch | ३२५.०० |
| 2 | Spl Breakfast buffet | ४५.०० |
| 3 | Spl Veg buffet dinner | १६०.०० |
| 4 | Hi tea Coffee and spl Snacks | ५०.०० |
| 5 | Spl Non veg buffet dinner | १६०.०० |
| 6 | VIP Spl Snacks | ४०.०० |
| 7 | Spl Mix fruits basket | २०.०० |
| 8 | Spl Peda | १५.०० |
| 9 | Modak | १८.०० |
| 10 | Spl Buffet VIP hi tea | १००.०० |
| 11 | Spl Break fast | ४०.०० |

| | | |
|---|---|---|
| 12 | Spl Veg dinner | १००.०० |
| 13 | Masala Dudh | १५.०० |
| 14 | Spl Non-Veg dinner | ११०.०० |
| 15 | Spl Veg Hi tea buffet | ५०.०० |
| 16 | Non-veg lunch thali full (buffet) | ११०.०० |
| 17 | Non Veg buffet lunch | १२५.०० |
| 18 | Spl Veg Non and Non Veg buffet dinner | ३५०.०० |
| 19 | Spl Lunch box | १२५.०० |
| 20 | VIP Veg Spl lunch | १२०.०० |
| 21 | Spl Non-veg lunch | १०५.०० |
| 22 | Tea Cup and Cookies | ३३.०० |
| 23 | Ukdi Modak | १५.०० |
| 24 | Kaju Modak | १८.०० |
| 25 | Exotic Fresh Fruits | २०.०० |
| 26 | Masala tea /coffee/Green tea | १४.०० |
| 27 | Samosa/Patti samosa/corns/ Ms. Idli/ Punjabi Samosa/Paneer Dhokla/Kachori | १५.०० |
| 28 | Rashmalai | १८.०० |
| 29 | Kothimbir Vadi | १५.०० |
| | **Total** | २३३१ |
| | **ANNEXURE A (Gen.food Items)** | १३३६ |
| | **ANNEXURE B (Spl.Food Items)** | २३३१ |
| | Total | ३६६७ |

३. मा. उप मुख्यमंत्री (श्री.एकनाथ शिंदे) यांचे "नंदनवन" या शासकीय निवासस्थानी येणा-या अतिथींसाठी खानपान सेवा पुरविण्यासाठी दि.१ मे, २०२५ पासून करार करण्यात येईल. करारनाम्यातील अटी व शर्ती पुरवठारास बंधनकारक असून त्याचे उल्लंघन झाल्यास सदर कंत्राट कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील. तसेच करारनामा नोंदणीकृत करुन आवश्यक ती नोंदणी फी/मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबादारी कंत्राटदाराची राहील.

४. मा. उप मुख्यमंत्री (श्री.एकनाथ शिंदे) यांचे "नंदनवन" या शासकीय निवासस्थानी खानपान सेवा पुरविण्यासाठी होणारा वार्षिक अंदाजित खर्च रु. १.५० कोटी असून या अनुषंगाने मे. श्री सुखसागर हॉस्पिटॅलिटी सर्विसेस, मुंबई यांना नोंदणी फी/मुद्रांक शुल्क भरावी लागेल तसेच सदर मुल्याच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम बँक गॅरटीच्या स्वरुपात शासनास आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत सादर करावी लागेल.

५. मा.उप मुख्यमंत्री(श्री.एकनाथ शिंदे) यांचे "नंदनवन" या शासकीय निवासस्थानाचे नियंत्रक निवासव्यवस्था हे कॅटरींग सेवेशी संबंधीत सर्व प्रकरणे हाताळण्यासंदर्भात सक्षम प्राधिकारी राहतील व विशेष महत्वाच्या प्रसंगी आवश्यकतेनुसार, "नंदनवन" निवासस्थानी बाहेरुन अथवा अन्य पुरवठादाराकडून खाद्यपदार्थ मागविणे अथवा खाद्यपदार्थ पुरविण्याच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे. या पदार्थांचे दर/दर्जा/प्रमाण हे सक्षम प्राधिकारी निश्चित करतील.

६. मा. उप मुख्यमंत्री(श्री.एकनाथ शिंदे) यांचे "नंदनवन" या शासकीय निवासस्थानी चालविण्यात येणाऱ्या उपाहारगृहाच्या जागेच्या भाड्याची आकारणी, वीज व पाणी बिलाची आकारणी शासन निश्चित करेल त्याप्रमाणे असेल.

७. मा. उप मुख्यमंत्री (श्री.एकनाथ शिंदे) यांचे "नंदनवन" या शासकीय निवासस्थानी उपहारगृह चालविण्यासाठी अनुक्रमे श्री. सुखसागर हॉस्पिटॅलिटी, मुंबई यांना वापरावयास देण्यात येणाऱ्या खोल्यांचे भाडे, वीज व पाणी यांचे भाडे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विकास (इलाखा शहर), मुंबई यांचेकडे शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार अनुक्रमे श्री. सुखसागर हॉस्पिटॅलिटी, मुंबई यांनी अदा करावे.

८. मान्य केलेल्या दराव्यतिरिक्त अन्य दराने अन्न पदार्थाचा पुरवठा केल्यास त्याबाबतचे देयक मंजूर करण्यात येणार नाही.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१३१५३२०३०३०७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEVIDAS SANDUJI BHAGURE

Digitally signed by DEVIDAS SANDUJI BHAGURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=0990ae5e49835c85a735703503a82e3cd3cdde019c8ce2fdb9c7765ef1b7c39f, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D19FEFD30011466572B4E69158C3099ADDED4CBB59D6833F72ED93F73A564DC, cn=DEVIDAS SANDUJI BHAGURE
Date: 2026.04.13 15:36:29 +05'30'

( दे. सां. भगुरे )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री. सुखसागर हॉस्पिलिटी, मयुर अर्पामेंट, हाऊस नं.१०६८, शॉप नं.३/४, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९.

**प्रत,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई,
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. आहरण व संवितरण अधिकारी, कार्यासन-२१, रोख शाखा, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई-३२.
५. उपसचिव (आस्थापना) मा.मुख्यमंत्री सचिवालय यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपाहारगृहाच्या अनुषंगाने आवश्यक त्या नोंदवह्या ठेवण्याबाबत तसेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत उपाहारगृहाच्या खर्चावर योग्य ते नियंत्रण ठेवण्याबाबत निवासी स्वीय सहायकांना सूचना द्यावी.
६. उपसचिव (आस्थापना) मा.उपमुख्यमंत्री सचिवालय यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपहारगृहाच्या अनुषंगाने आवश्यक त्या नोंदवह्या ठेवण्याबाबत तसेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीत उपाहारगृहाच्या खर्चावर योग्य ते नियंत्रण ठेवण्याबाबत निवासी स्वीय सहायकांना सूचना द्यावी.
७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम इलाखा शहर विकास भाग इमारत, तिसरा मजला, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई यांना कळविण्यात येते की मा.उपमुख्यमंत्री (श्री. एकनाथ शिंदे) महोदयांच्या "नंदनवन" या शासकीय निवासस्थी चालविण्यात येणाऱ्या उपाहारगृहाच्या जागेच्या भाडयाची आकरणी, वीज व पाणी बिलाची विहीत वेळेत वसुली करण्यात यावी.
८. निवडनस्ती/ का.मंआस्था-२